**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे १**
E_mail - jdhepune@gmail.com
Web:www.jdhepune.info
फॅक्स नं. 020-26051632
फोन नं.020-26127833/26051632

क्र.ससं/उशि/पुवि/बोगस पदवी/कारवाई/२०१८/ 2344 दि.१२/०९/२०१८

**परिपत्रक/महत्वाचे**

विषय:- शिखर संस्थांशी संलग्नित नसलेल्या व राज्य किंवा केंद्र शासनाकडून मान्यता न मिळालेल्या महाविद्यालये/ विद्यापीठे / संस्था यांचेकडून पदवी व पदव्युत्तर वर्ग चालविले जात असल्याबाबत...

संदर्भ:- मा.संचालनालयाकडील परिपत्रक क्र.युएनआय-२०१८/बो.विद्यापीठ/तक्रार/ सर्व सह/संकीर्ण/विशि-१/४४०२, दि.०९/०४/२०१८, २१/०८/२०१८ व ११/०९/२०१८.

विषयांकीत प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, उच्च शिक्षण शिखर संस्थांशी संलग्नित नसलेल्या व राज्य किंवा केंद्र शासनाकडून मान्यता न मिळालेल्या महाविद्यालये/ विद्यापीठे / संस्था यांचेकडून पदवी व पदव्युत्तर वर्ग चालविले जात असून, काही संस्थांकडून संशोधनाच्या पदव्या दिल्या जात आहेत.

तसेच महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या आस्थापनेवरील कार्यरत असणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काही बोगस विद्यापीठांकडून डी.लिट. सारखी अतिउच्च पदवी दिली जात असल्याचे आढळून आले आहे. शिखर संस्थांची मान्यता नसलेल्या संस्थांकडून अशा प्रकारची पदवी मिळवून कोणी कार्यरत असेल तर त्यांचेवर नियमानुसार कारवाई करणेविषयी संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना या परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात येत आहे.

विभागातील बोगसपणे पदव्या देणाऱ्या संस्थांविरुध्द विधी व न्याय विभाग, सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२०, महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील कलम ५ च्या तरतूदीनुसार व शासन नियमानुसार कारवाई करणेबाबतचे निर्देश मा.संचालनालयाने संदर्भिय परिपत्रकान्वये दिलेले आहेत.

यानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना अवगत करण्यात येते की, विद्यापीठे, संस्था तसेच खाजगी व्यवस्थानाद्वारे चालविण्यात येणारी अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यामध्ये कार्यरत असणाऱ्या अध्यापक/अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारे मान्यता प्राप्त

नसलेल्या संस्थांकडून पदवी/पदव्युत्तर पदवी घेतली असल्यास, उपरोक्त निर्देशाप्रमाणे विनाविलंब कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास **सात दिवसांत** अवगत करण्यात यावा.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-1.

प्रति,

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
३) कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संशोधन संस्था, पुणे
४) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
५) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
६) प्राचार्य/प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था, पुणे/अहमदनगर/नाशिक जिल्हे.
२/- संबंधीत प्राचार्यांना सूचीत करण्यात येते की, प्रस्तुत परिपत्रक आपल्या महाविद्यालय/संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत :-

मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.